# प्रभुतरुण

वर्ष ४७ | अंक १२ | मुंबई | जून २०१४ | पाने ६ | किंमत रु. १

( *स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## अनुशेष वाचनाचा

—सुहासिनी कीर्तिकर

**कृतज्ञ स्मरण**



**विहंग नायक**

गेल्या महिन्यात माझा एक विद्यार्थी यशस्वी कारकीर्द करून निवृत्त झालाय. श्रीराम शिधये त्याचं नाव. 'महाराष्ट्र टाइम्स'चा प्रमुख कार्यकारी संपादक. मी चारेक महिन्यापूर्वी त्याच्या कचेरीत गेले होते. निवासी संपादक असलेले श्रीकांत बोजेवार ('दोन फुल- एक हाफ', 'दीड दमडी'वाले तंबी दुराई ते हेच!) म्हणाले, ''शिधयेच्या मॅडम ही नवीनच ओळख झाली आपली. सुहासिनी कीर्तिकर म्हणूनच ओळखत होतो आजपर्यंत. फार चांगला विद्यार्थी घडवलाय् तुम्ही.'' 'चांगला विद्यार्थी' घडवला जात नाही. तो आपले आपले संस्कार घेऊन घडतच असतो. त्या संस्कारांचे प्रत्यंतर अलीकडे मला आले. निवृत्त होताना त्याने मला पत्र पाठवले. चक्क पत्र! 'ई-मेल' करणारा श्रीराम. आधुनिक प्रसारमाध्यमांचा अतिशय मार्मिक वापर करणारा श्रीराम. पण त्याला असं वाटलं; फार तीव्रतेनं वाटलं की या निवृत्तीच्या टप्प्यावर आपल्या आयुष्याचा किंचित मागोवा घ्यावा, मनी दाटून आलेली कृतज्ञता व्यक्त करावी, पुढच्या आयुष्याविषयी काही विचार बाईंबरोबर वाटून घ्यावेत, असं वाटून त्यानं त्याच्या अक्षरात चक्क पत्र लिहिलं; भरगच्च मजकूर असलेलं छोटंसं पत्र. बाईंविषयी भावना, कॉलेजचे मंतरलेले कृतज्ञ दिवस... हे सारं त्यात होतंच. पण पुढील आयुष्याबद्दल बोलताना त्याचं एक वाक्य मनाला भिडलं. त्यानं लिहिलं होतं, 'वाचनाचा अनुशेष पाहून छाती दडपून जाते.' किती खरंय्. त्याच्याकडे सगळा विवेकानंद आहे, लोकमान्य टिळक आहे, शि. म. परांजपे... सावरकर... असे सगळे सगळे त्याच्या संग्रही आहेत. विज्ञानाविषयी तो भरपूर वाचतो, लिहितो. मराठी -इंग्रजी असे सगळे कवी त्यानं आवडीनं हाताशी ठेवले आहेत. तो विरंगुळा म्हणून, आवड म्हणून, सवड म्हणून सतत वाचतच असतो. तरीही... तरीही त्याचा वाचनाचा अनुशेष अजून बाकी आहे!

माझा एक वर्गमित्र होता. (आता 'होता' असंच म्हणायचे!) प्रभाकर गाडगीळ. त्यानं पुढे कॉलेजमध्ये इंग्रजीचं अध्यापन केलं. प्रेमलग्न केलं. त्याच्याच विद्यार्थिनीशी. स्वतंत्र घर घेतलं. त्या घरात एक स्वतंत्र खोली फक्त पुस्तकांसाठी! दर महिन्याला तो न चुकता दोन पुस्तकं विकत घ्यायचा. काहीही झालं तरी. कधी बायकोनं तक्रार केली तर म्हणायचा, ''सुहास, हिला सांग की मी दुसरं कसलं व्यसन केलंय का? हे बरंय नं?'' खरंय अगदी. 'पुस्तकाचं व्यसन' किती चांगलं! माझा मित्र सतीश काळसेकरनं एक घर असताना दुसरं घर घेतलंय्. फक्त पुस्तकांसाठी. तोवर माळ्यावर पडून असणाऱ्या बिचाऱ्या पुस्तकांवर त्यानं जीवाला लागणारी कविताही केलीय्.

वाचनाची अशी असोशी असली की वाचनाचा अनुशेष वाढतच जातो ना! त्यासाठी नवीन घर घेणं सगळ्यांनाच कसं जमणार? पण पुस्तकांनी मनात घर केलेलं असलं की आपोआपच नवनवीन मार्ग सापडत जातात. आधुनिक विज्ञानानं ते खुले केले आहेत.

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## NAUKRI MOCKERY

-Vaijayanti Kirtikar

Embarrassed!! That's the only feeling I have right now. Oh how I wish the earth would gobble me up. I am sure all of us have felt this way once in a while. Well, the reason for my embarrassment is my peanut sized cell phone. Yeah, you've read it right. I am in a midst of an interview for a very important job position, means the world to me and there's a very confident smile on my face as I happily face the barrage of questions. "tera pyaar pyaar pyaar hookah bar" "tera pyaar pyaar pyaar hookah bar" "tera pyaar pyaar pyaar hookah bar" loud and clear my phone starts wailing. I want to stuff something down the singer's throat, oh stop please, but it just goes on relentless. There goes my prestigious job down the drain. Thoughts race through my mind, while I so meticulously checked on all other details before the interview, viz. makeup spot on, formals wrinkle free, shoes shining, hair not a strand out of place, ah I missed the damn phone. I forgot to put it on silent mode and then it decides to break me out of my reverie by once again shrieking that awful song. I reach out for my purse and frantically try to wrap my fingers around the phone. At this moment, life's one more awful truth strikes me, I am a woman!! I'm trying to find my phone in my overstuffed purse. I don't want anything to fall out of my purse for the interviewer's prying eyes to see, so the task gets more difficult. I am sure by now the guy opposite me is disgusted. Finally yes, my phone!! I pull it out triumphantly, switch it off and place it firmly on the table between us. I look up with an apology just about to flow from my lips, but I see the incredulous look on his face. He is staring at my phone. Oh, ok, well like I mentioned earlier it is a peanut sized phone, but it does serve all purposes, including making me feel embarrassed. I hate that look on his face. So the world has come to this, you are being judged by the size and brand of the phone you carry!! I am going to be listed as the black sheep amongst all who will be vying for this position. I quickly mumble an apology, we go on with the interview, and the rest of it is a haze, no prizes for guessing the outcome.

All of us have at some point of time in life been through similar situations. You're so tired of your current role, you want more money, or you simply want to relocate, whatever it is, you're so ready to jump. You submit resumes left, right and center, and you get called for interviews. It is game time. Finally it happens! A bite! Either you bite success or you bite dirt. Blessed are those who taste success, the rest continue with the game. I recently came across a rather interesting interview story online, it goes like this:

Interviewer: Tell me about yourself.

Candidate: I am Hari. I did my Tele Communication Engineering from Rolex Institute of Technology.

Interviewer: Rolex Institute of Technology? Never heard of this college before.

Candidate: Great! Even I had not heard of it before getting admission into it. What happened is, due to Cricket world cup I scored badly! I was getting a paid seat in a good college, but my father said "I cannot invest so much money", so I had to join this college. Frankly speaking this college…

Interviewer: Ok, ok. It seems you have taken 6 years to complete your engineering.

Candidate: Actually I tried my best to complete it in 4 years, but you know these, cricket matches, football world cup and tennis tournaments. So I flunked in $2^{nd}$ and $3^{rd}$ year. So in all I took 4+2, total 7 years.

Interviewer: But 4+2 is 6.

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)

मोठमोठ्या वाचनालयात, वृत्तपत्रसंस्थांच्या संग्रहालयात पुस्तकांच्या, लिखाणाच्या आटीव (मायक्रो) फिल्म्स काढल्या जातात. जागा वाचवली जाते. हल्ली तर धावपळीच्या जीवनात सकाळपासून रात्रीपर्यंत राबताना अनेकजण रोजचं वर्तमानपत्रही घेत नाहीत म्हणे! येण्याजाण्याच्या कारमधल्या प्रवासात बातम्या ऐकतात. विकीपीडियावर वाचतात. गेल्या महिन्यात तर माझी मोठी फजितीच झाली म्हणायची! झालं काय की, माझ्या तिसरीत असलेल्या नातीला वाचनाचा छंद आहे. थोडंफार 'टला ट, रला र' जुळवतेही ती. तिचा एप्रिलमध्ये वाढदिवस असतो. परीक्षेचा निकाल लागलेला. त्याचं बक्षिस आणि वाढदिवसाची भेट म्हणून तिच्याच मागणीवरून मी तिला चांगली चारपाच मराठी आणि चारपाच इंग्रजी पुस्तकं आणली. विविध प्रकारची. (अर्थात कपडे, इतरही भेटवस्तू होत्या म्हणा! पण पुस्तकं हा माझ्याच जीवीचा विषय!) खूष झाली ती. पण हाय! झालं काय; की त्याच वाढदिवसाला तिला तिच्या आईबाबांनी 'किंडल'ची भेट दिली.

तोपर्यंत 'किंडल' ऐकूनच माहीत होतं मला. साधारण पोस्टकार्डाच्या आकाराचं यंत्र. त्यात तीन हजार पुस्तकं सामावलेली. अगदी चकटफू! आणखी हवी असल्यास 'डाऊनलोड' करता येतात. अल्लादिनचा दिवाच म्हणायचा हा. हवा तेव्हा हातात घ्या, वाचनात रमून जा. मग या माझ्या लाडक्या छोटीला माझ्याकडच्या आठनऊ पुस्तकांची काय पत्रास? तिनं ती पुस्तकं आठ दिवसात वाचून खतम् केली अन् म्हणाली, 'आता घेऊन जा ती. माझ्या कपाटात (खरं तर ती 'माझ्या लायब्ररीत' असंच म्हणाली होती.) जागा नाही.' मग तिच्या आईनंच ती दुसऱ्या कुणाला तरी वाचनगोडी वाढण्यासाठी देऊन टाकायची तिला युक्ती सांगितली. पटली तिला ती. चला! जाताजाता पुस्तकदानाचा असाही एक चांगला संस्कार!

'किंडल'च्या पार्श्वभूमीवर म्हणूनच मला शिधयेच्या पत्रलेखनाचे वेगळेपण जाणवले. कसं असते ना? जग पुढंपुढं जातच असते. त्याची अभिव्यक्तीची भाषा बदलत असते. पण मूळ संस्कार-श्रीमंती बदलत नाही. फार वर्षांपूर्वी, म्हणजे फारच वर्षांपूर्वी; एका कवीसंमेलनात कवी म्हणवणाऱ्या उत्साही माणसानं एक तालबद्ध कविता ऐकवली होती. त्याचा मुखडा आठवतोय्.

'अहो जग पुढे गेले, सारे आता मागे राहिले; आता साऱ्यांच्या ओठावरी लारीलप्पा लारीलप्पा आगीटप्पा, आगीटप्पा'. हा मुखडा श्रोत्यांनी उचलून धरला होता. 'लारीलप्पा लारीलप्पा' हे एका सिनेगीतातील ओळखीचे बोल होते. ते बोल, तो ताल श्रोत्यांना आवडला. 'जग पुढे गेले' हे त्यातले सत्यही कदाचित्! या कवितेनंतर विंदांनी आपली 'दाताकडून दाताकडे' कविता ऐकवून जग पुढे गेले तरी आपण तेच आहोत हे डोळे मोठ्ठे करून सांगितले होते!

पत्र आणि किंडल- असा जग पुढे जाण्याचा टप्पा आपण आज पार पाडला तरी खरंच आहे ना- की आपण तेच आहोत. पुस्तकांना कशीही घरं आपण दिली तरी त्या पुस्तकांचे आपल्या मनात असलेले घर 'पृथ्वीची साळुंकी, आकाशाची महिरप' असलेल्या आपल्या वैश्विक घरापेक्षाही खूप खूप मोठे आहे! भव्य आहे. श्रीमंत आहे.

ही श्रीमंती आहे म्हणूनच तर; पाठारे प्रभू माणूस इतर वाचन केले तरी चातकासारखी दर महिन्याच्या 'प्रभुतरुणा'ची वाट पाहात असतो. सोळा तारखेला पोस्टात पडणारा प्रभुतरुण वीस-बावीस तारखेपर्यंत घरात भेटीला आला नाही तर हा आपला श्रीमंत माणूस अस्वस्थ होतो. संपादकांना फोन करतो. नाराजी दर्शवतो. कारण? कारण 'प्रभुतरुणा'विना त्याचाही वाचनाचा अनुशेष बाकी राहतो महिन्याचा. संपादक या नात्यानं मला अशा अस्वस्थांची तगमग कळते. कारण आपण सगळेच 'प्रभुतरुणा'चे वाचक म्हणून समसुखी आहोत. नाही मिळत अंक तर समदु:खी असतो.

वाचनानंदाच्या बाबतीत 'सुखदु:ख समे कृत्वा' नाहीच जमत ना! म्हणूनच 'अहो जग पुढे गेले, सारे आता मागे राहिले' तरी आपल्या साऱ्यांच्या ओठांवर (आणि मनातही!) मात्र 'प्रभुतरुण' आणि प्रभुतरुणच. हो!अशी 'अवस्था लावून' जाणाऱ्या एका समर्थ संपादकाचं- विहंग नायक यांचं कृतज्ञ स्मरण करणं क्रमप्राप्तच आहे. त्यांच्याबद्दलच्या आठवणींना अंत नाही. तेव्हा मित्रहो, थांबतेच इथे आता.

✳

विस्तारीत संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

Candidate: Oh, is it? You know I had KT in Maths. But I will keep this in mind, 4+2 is 6, good, thanks. These cricket matches really affect my exam scores; I think they should ban them.

Interviewer: Good to know that you want cricket matches to be banned.

Candidate: No, no... I am talking about exams!

Interviewer: Ok, what is your biggest achievement in life?

Candidate: Obviously, completing my engineering! My mom never thought I would complete it. Infact, when I flunked in 3rd year, she was looking for a job for me in BEST through some relative.

Interviewer: Do you have any plans of higher studies?

Candidate: he he he... are you kidding? Completing 'Lower education' itself was so much pain.

Interviewer: Let's talk about technical stuff? Which platforms are you acquainted with?

Candidate: I travel daily from Virar to Andheri by train for work, so I am well acquainted with all platforms in between.

Interviewer: Which Languages have you used?

Candidate: English. By the way, I can keep quite in German, French, Spanish and many other languages.

Interviewer: Why VC is better than VB?

Candidate: It is common sense – C comes after B, so VC is higher version than VB. I heard very soon they are coming with new language VD!

Interviewer: Do you know anything about assembly language?

Candidate: This is the language out ministers and MPs use in the assembly.

Interviewer: What is your general project experience?

Candidate: My general experience about projects is – most of them are in pipeline!

Interviewer: Tell me about your current job.

Candidate: Currently I am working for XYZ infotech ltd. Since joining, I am on Bench. Before joining XYZ, I used to think Bench was a software like Windows!

"tera pyaar pyaar pyaar hookah bar", oops, this interview goes on, God bless the interviewer and Hari!! But my phone is crying out for me now, gotta get it, maybe some recruiter on the other line, remember the game is on!!

✳

## पाठारे प्रभु महिला समाज

महिला समाजाचे हे शताब्दी महोत्सवी वर्ष. या वर्षाच्या कार्यक्रमांची सुनियोजित आखणी करण्यासाठी दि. २५ मे १४ रोजी श्रीमती प्रमिला तळपदे यांच्या निवासस्थानी बैठक घेण्यात आली. कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांसह झालेल्या या सभेत ज्ञातीतील विविध मान्यवरांना निमंत्रित केले होते. श्री. प्रताप वेलकर हे निमंत्रितांमधील अग्रणी सभेच्या अध्यक्षस्थानी होते. त्यांनी मोलाच्या सूचना करून मार्गदर्शन केले. आशीर्वाद दिले. १४ सप्टेंबर रोजी रवींद्र नाट्य मंदिरात होणाऱ्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाने या महोत्सवाची सुरुवात होणार आहे. दोन दिवसीय साहित्य संमेलन, बालशिबीर, ठाणेसारख्या शहरात आनंदमेळा आदी कार्यक्रमांना सभेत मान्यता लाभली. स्मरणिका, देणग्या जमविणे, कार्यक्रम आयोजित करणे आदींसाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या. याच सभेत श्री. प्रताप वेलकर, श्रीमती प्रमिला मधुकर तळपदे (८० वर्षे झाल्याबद्दल), श्रीमती सुहासिनी कीर्तिकर (७० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल), श्री. शीतल तळपदे आणि श्री. हिरेन नायक (नोकरीत बढती मिळाल्याबद्दल) यांचा चॉकलेट आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

**'महिला समाजाची शंभरी होऊ द्या अविस्मरणीय साजरी'**

महिला समाजाचे शतकमहोत्सवी वर्ष समाजाला भरभराटीचे जावो, ही मन:पूर्वक शुभेच्छा. या महोत्सवात विविध करमणुकीच्या कार्यक्रमात आणि नृत्यात सहभागी होण्यासाठी सौ. मयुरा गुंजारव नायक (मोबाईल क्रमांक: ९८१९९३२७४०) यांच्याशी संपर्क साधावा. कवयित्रींचे संमेलन साहित्य संमेलनात असेल. त्यातील सहभागासाठी प्रा. सुहासिनी अशोक कीर्तिकर यांच्याशी त्वरित संपर्क साधावा. (मोबाईल क्रमांक: ९८२०२५६९७६). कविता सादरीकरणासाठी तालीम घेतली जाईल. रंगीत तालीमही असेल. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने प्रतिसाद अपेक्षित आहे.

✳

## पाठारे प्रभु सोशल समाज

✳ सोशल समाजातर्फे आषाढी एकादशीनिमित्त अभंगयात्रा शनिवार दिनांक ५ जुलै २०१४ रोजी दुपारी ४ वाजता व्यंकटेश मंदिर, ठाकुरद्वार येथे आयोजित केली आहे. तरी सर्वांनी यात सहभागी व्हावे असे आवाहन समाजाच्या कार्यकारी समितीतर्फे केले गेले आहे. इच्छुक गायकांनी अधिक माहितीसाठी चिटणीसांशी संपर्क साधावा.

✳ पा. प्र. सोशल समाजाची एकदिवसीय वर्षासहल रविवार दिनांक २० जुलै, २०१४ रोजी सभासदांकरिता आयोजित केली आहे. अधिक माहितीसाठी कृपया संयुक्त चिटणीसांकडे चौकशी करावी. संयुक्त चिटणीस: (१) सौ. नीता सेंजित ९८२०१६६६२८, (२) श्री. जयंत कीर्तिकर ९८६७९५८५३५

## पाठारे प्रभु चॅरिटीझ

दिनांक १ जून २०१४ रोजी पा. प्र. चॅरिटीझची वार्षिक सर्वसाधारण सभा श्री. उदय शंकर मानकर यांच्या अध्यक्षतेखाली दरवर्षीप्रमाणे सुरळीत पार पडली.

## कृतज्ञता

'प्रभुप्रभात' मासिकाच्या गेल्या दोन अंकात श्रीमती सुहासिनी सुहास कोठारे आणि 'प्रभुतरुणा'च्या संपादिका सुहासिनी अशोक कीर्तिकर यांच्या वाढदिवसाप्रीत्यर्थ गौरवपूर्ण शुभेच्छा व्यक्त झाल्या. 'प्रभुतरुणा'तर्फे त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

लेखांक ६

# माणूस म्हणून-
## नवी दिशा

-डॉ. सुमन नवलकर
(मोबाईल-९८६९०२८९६७)

''चिंटू अगदी धमाल करत असणार!सुट्टी सुरू झालीय् ना? पण आज फोनमधून त्याचा आवाज कसा ऐकू येत नाहीये? झोपलाय की काय पल्लवी?''

''झोपतोय कसला भरदुपारी? रात्री पण झोपून वेळ फुकट घालवायची तयारी नसते त्याची. तो काय दिवसा ढवळ्या झोपणार आहे राधा?''

''मग कुठे शेजारी-पाजारी गेलाय की काय खेळायला? तशी तू काही सोडणार नाहीस म्हणा अशी दुपारची मस्ती करायला. पण चूपचाप कसा, म्हणून विचार पडलाय इतकंच.''

''नाही ग. 'डे केअर'मधे पाठवते त्याला. पाठवते कसली? मीच घेऊन जाते आणि घेऊन येतेही.''

''जवळच आहे वाटतं?''

''नाही ग राधा. सांताक्रूझला आहे 'डे केअर'. रिक्शाने नेते. येताना पराग आणतो कधी-कधी.''

''जातो का आवडीने?''

''खरं सांगू राधे, सुरुवातीला दोन-तीन दिवस लागले रुळायला. पण आता जातो आवडीने. ती माझी मैत्रीण जागृती आहे ना, तिच्याच बंगल्याच्या गच्चीवर. अर्धी गच्ची तिने बंद करून घेतलीय. छान ए.सी. लावलाय. खूप खेळ, पुस्तकं ठेवलीत. सकाळी दहा ते संध्याकाळी सहामधे केव्हाही न्यायचं आणि केव्हाही परत आणायचं.''

''अगं पल्लवी, एरव्ही शाळा असतेच. निदान सुट्टीत तरी घरी राहू द्यायचं ना त्याला? एरव्हीही शाळेतून आल्यावर तुझ्या आई-बाबांकडेच असतो ना? मग सुट्टीत तरी राहू द्यायचं होतंस ना त्याला घरात? स्वत:कडे नाही तर आजी-आजोबांकडेतरी? की तिथेही जायला नाखूश असतो?''

''छे गं, माझ्यापेक्षा तेच हवे असतात त्याला. पण त्यांनाही नको का आराम जरा? हा चांगली सेवा करून घेतो त्यांच्याकडून. शिवाय मी जे देत नाही, ते त्यांच्याकडून मिळवतो. घरी मी सारखं मोबाईल, लॅपटॉपवर खेळायला देत नाही. तर तिथे गेल्यावर अख्खा दिवस मोबाईल-लॅपटॉपमध्ये डोळे खूपसून बसतो. शिवाय तुला ठाऊक आहं ना राधा, त्याच्या काका-मामांना बालपणीपासूनच चश्मे. तसाच यालाही लहान वयातच लागेलशी भीती वाटते. 'डे केअर'मधे त्या डोळ्यांना जरा आराम मिळतो. आता तर तिथे जायला 'चल' देखील म्हणावं लागत नाही. आपण होऊन तयार होऊन माझ्या मागे लागतो की 'चल'. तिथल्या नव्या दोस्तांबरोबर खेळायची घाई होते त्याला. तो गेला की मलाही मिळतो जरा वेळ.''

पल्लवी चित्रकार. पुस्तकं, मासिकं वर्तमानपत्रं यांची रीघ लागते तिच्याकडे चित्रांसाठी. वेळेअभावी कामांवर मर्यादा येतात. पण चिंटू 'डे केअर'मधे गेला की तिलाही वेळ मिळतो कामासाठी. एरव्ही ती काम करत असली की चिंटू आजी-आजोबांकडे असतो, तिच्याच कॉलनीत. पण आता या 'डे केअर'मुळे त्यांनांही जरा सुट्टी मिळते.

राधाही नोकरी करते. तिचा विराजही पाळणाघरातच असतो. पण त्याला शाळेला सुट्टी पडली की राधाही ऑफिसमधून सुट्टी घेते.रौनकलाही रजा घ्यायला लावते. मग कुठेतरी बाहेरगावी जायचा बेत होतो. शहरातल्या शहरात फिरणं होतं. खास त्याच्या आवडीचे जेवण-खाण्याचे बेत होतात. त्याच्याबरोबर कॅरम, बुद्धीबळ खेळलं जातं. संध्याकाळी बागेत सी-सॉ, घसरगुंडी, झोपाळ्यावर बसणं होतं. एकमेकाच्या सहवासात सुट्टी साजरी होते.

''एवढी सुट्टी बरी मिळते तुला राधा?'' पल्लवीला प्रश्न पडतोच.

''अगं, त्याच्या सुट्टीशी जुळवून घ्यायसाठी राखूनच ठेवतो आम्ही सुट्ट्या. शिवाय आमच्या सुट्टीत ऋजुताताईंची वेदश्री पण आमच्याकडे असते. ऋजुताताई सुट्टी घेतात तेव्हा विराज त्यांच्याकडे जाऊन राहतो. आजकालची ही एकुलती एक मुलं. आम्ही सुट्ट्या जुळवून घेतल्यामुळे मुलांनाही एकमेकाशी जुळवून घ्यायची सवय होते. त्याग, भावंडांचं प्रेम हे सगळं कळतं त्यांना. भांडतात, पण गळ्यात गळेही घालतात.''

''मग आज कसा विराजचा आवाज येत नाहीये ऐकू?''

''अगं, बाजूच्या खोलीत वेदश्री आणि तो ल्यूडो खेळत बसलेत. मघाशी भांडत होते जोरात. 'सारखे सारखे सहाच कसे पडतात तुझे?' असे ती विचारत होती आणि 'असे' म्हणून तो पुन्हा सहा पाडून दाखवत होता. तेवढ्यात मी कशालाशी गेले, तर दोघांनीही भांडण आटोपतं घेऊन चूप-चाप खेळायला सुरुवात केली. मी वेदश्रीला पाठवून देईन तिच्या घरी, या भीतीने.''

''आई, आम्हाला भूक लागलीय.'' विराजचा आवाज ऐकून पल्लवी म्हणाली, ''दे बाई त्यांना खाऊ, राधा. ठेव फोन. काय बनवलंयस आज?''

''अग, कलिंगडचा ज्यूस. आणि कैरी घालून भेळ. माहीत आहे ना दोघांना आजचा मेन्यू. म्हणून तर भूक लागलीय. चल, ठेवते फोन. भेळ बनवून देते दोघांना.''

फोन ठेवल्यावर पल्लवीला चिंटूची खूप आठवण आली. जागृतीच्या बाईंनी 'डे केअर'च्या मुलांसाठी काहीतरी बनवलं असेल ते खाईल तो. पण त्याला आपल्या हातचा पिझ्झा आवडतो. भेळही आवडीने खातो तो. एरव्ही आजीकडे शिरा-पोहे खातोच तो. पण आपल्याही हातचे काही पदार्थ खास आवडतात त्याला. कित्ती दिवसात कुठे फिरायलाही नेलं नाहीये आपण त्याला. चांगले-चांगले पर्याय देऊ केले त्याला, तर तो कशाला लॅपटॉप आणि मोबाईलला चिकटून बसेल? त्याचे काका-काकीही शहरातच राहतात. त्यांची नीलाक्षीही एकटीच पडते सुट्टीत. आपणही नीलाक्षीला सुट्टीत आणलं, चिंटूला नीलाक्षीकडे पाठवलं तर? आपणही चिंटूच्या काका-काकींबरोबर आपली सुट्टी जुळवून घेतली तर?बस्स ठरलं. पुढल्या वर्षी असंच करायचं.

पराग येता-येता चिंटूला घेऊन आला. चहा पिता-पिता मग पल्लवीने हा बेत परागपुढे ठेवलाच. पराग म्हणाला, ''पुढली सुट्टी कशाला? आत्ताच जाऊया पंचगणीला ऑफिसच्या रेस्ट-हाऊसमध्ये. दादा-वहिनीनाही करतो फोन. तूही बोलव तुझ्या आई-बाबांना. त्यानाही हवापालट होईल.''

''मीच करतो बाबा नीलूताईला फोन, की मेसेज पाठवू?'' चिंटूने मोबाईल उचललाच.

''नको- नको. तू नको. आधी बाबाना रेस्ट हाऊसचं बुकींग करू दे. मग तेच सांगतील काकाना. '' म्हणत पल्लवीने त्याच्या हातून मोबाईल काढून घेतला.

''मग मी गेम खेळतो लॅपटॉपवर.'' चिंटू निघालाच. पण त्याला थांबवत पल्लवी म्हणाली, ''त्यापेक्षा तू हात-पाय-तोंड स्वच्छ धू आणि हे नवे कपडे घाल. आपण बागेत जाऊ या. नवे छान-छान खेळ बनवलेत बागेत. माहितीय का चिंटू?''

बाग आणि खेळ म्हटल्यावर चिंटू लॅपटॉप विसरला आणि हात-पाय-तोंड धुण्यासाठी गेला. पराग थकून आला होता. पण रेस्ट हाऊसचं बुकींग मिळालं आणि दादा-वहिनीही तयार झाले म्हटल्यावर त्याचा थकवाही पळाला. ''आई-बाबाही तयार झालेत.'' पल्लवीने तेवढ्यात त्यांनाही विचारलं होतंच. बदल सर्वांनाच हवा-हवासा होता. नवी दिशा सापडल्यासारखी पल्लवी प्रफुल्लीत झाली. जाऊन तिने तिचा लॅपटॉप बंद केला. बाकी सगळं सामानही गुंडाळून ठेवलं आणि चिंटूबरोबर बागेत जाण्यासाठी नवा फुलाफुलांचा सलवार-कमीज चढवला.

आज मन आणि शरीर दोन्ही कसं पिसासारखं हलकं झाल्यासारखं वाटतेय. खूप दिवसांनी आज बागेतही खूप-खूप मजा आली. बदल सर्वांनाच हवा-हवासा होता. त्याच्या कल्पनेनेच सुखावले होते सगळे.

बागेतून परतताना कोपऱ्यावरच्या दुकानातून पल्लवीने पिझ्झाच्या ब्रेडची पाकिटं घेतली. चीज घेतलं. ''घरी गेल्यावर दादांना फोन कर पराग. म्हणावं, उद्या ऑफिसला जाताना नीलूला आमच्याकडे सोडा म्हणावं.''

''उद्या ऑफिसमधून आल्यावर मीही पिझ्झाच खाणार हं पल्लू.'' पराग म्हणाला. ''हूं आमच्या परागबाळाला पिझ्झा आवडतो ते लक्षात आहे माझ्या.'' पल्लवी हसून म्हणाली. नवी दिशा तिलाही खुणावीत होती, तिलाही सुखावीत होती.

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



# युवामंच

## सार्वत्रिक निवडणुका आणि त्याचे पडसाद: एका अनिवासी भारतीयाच्या चष्म्यातून

**-सुजन राणे**
न्यू जर्सी, यु.एस.ए.

भारतात नुकत्याच सार्वत्रिक निवडणुका आटपल्या आणि अपेक्षेप्रमाणे बीजेपी सत्तारूढ झाली आहे. मी एक अनिवासी भारतीय असल्यामुळे या निवडणुकीकडे सर्वसाधारण भारतीयांची अपेक्षा काय असू शकेल आणि ती कितपत फलद्रूप होईल या दिशेने विचार करण्याचा मोह टाळता येत नाही. सर्वप्रथम असे वाटते की भारतात अमेरिकन, ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया यासारख्या लोकशाही देशात जसे दोन किंवा तीन राजकीय पक्ष आहेत तसे असावेत. या विचारसरणीमागे मुद्दा असा आहे की भारतासारख्या मोठ्या देशात अनेक लहान लहान पक्ष असल्यामुळे लोकांची मते त्या त्या पक्षाच्या विचारसरणीप्रमाणे विखुरली जातात. अशा प्रवाहामध्ये प्रांतीय समस्या बळावतात आणि राष्ट्रीय हित मागे पडते. तेव्हा आता अशी वेळ आली आहे की जो पक्ष सतत येतो त्याने राष्ट्राच्या हिताच्या बाबतीत दूरदर्शी राहून घटनेमार्फत ही परिस्थिती बदलण्यासाठी तयारी दाखवली पाहिजे. ही एक मोठी राजकीय समस्या आहे आणि ती जर वेळेवर सोडवली नाही तर भारताला मोठी किंमत मोजावी लागेल. भारताचे तुकडे व्हायला वेळ लागणार नाही.

या संदर्भात जर आपण इतिहासाचा मागोवा घेतला तर आपल्याला असे आढळते की सम्राट चंद्रगुप्त मौर्यच्या (३४०-२९८ इ.स. पूर्वी) राज्यात, चाणक्यच्या उपदेशामुळे तसेच मोगलांच्या राजवटीत (इ.स. १५२६-१७०७), मराठ्यांच्या हाताखाली (१७४९-१८१८) आणि शेवटी ब्रिटिशांच्या राजवटीत (१८१८-१९४७) भारत एक संघटीत देश म्हणून जगत आला आहे. पण याचे मुख्य श्रेय त्या सर्व ऐतिहासिक घडामोडीत भारताला मजबूत केंद्र सरकार लाभले होते. मोगलांपासून ते ब्रिटिशांपर्यंत भारताला अनेकवेळा प्रांतिक चढउतार सहन करावे लागले असतील, पण भारत एक राष्ट्र म्हणून टिकून राहिला आहे याचे कारण भारतीय संस्कृती हा मुख्य घटक होता. म्हणजे सनातनी विचार. धर्मावर अंधश्रद्धा, सर्वसाधारणा सारखी राहणी. अर्थात या घटकाला भारतातले अनेक धर्म, अनेक भाषा, अनेक चालिरीती, निरनिराळ्या खाण्यापिण्याच्या सवयी, पुष्कळ वेळा बाधा आणत होत्या. शेवटी १९४७ साली दुर्दैवाने धर्माच्या आधारावर हिंदुस्थानचे भारत आणि पाकिस्तान असे दोन तुकडे झाले, ही वस्तुस्थिती आपल्याला मान्य करावी लागेल. पाकिस्तानात पक्षपाती आणि केवळ सैन्याच्या दडपणाखाली केंद्र सरकार असल्यामुळे पाकिस्तानला बांग्लादेशाचे अस्तित्व मानावे लागले. आमची संस्कृती, आमची संस्कृती असे वारंवार उगाळण्यात एक प्रकारचा पोरकटपणा वाटतो. अशा वेळी संस्कृतीला धरून कणखर नेतृत्व मिळाले तर देश टिकू शकतो. तेव्हा प्रश्न असा उद्‌भवतो की सम्राट चंद्रगुप्त काय किंवा अकबर बादशाह काय किंवा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन सारखे मजबूत पुढारी लाभले तर राष्ट्र टिकत असते. भारत अशा परिस्थितीतून सध्या जात आहे. नरेंद्र मोदी किंवा त्यांच्यासारखे संभाव्य मजबूत पुढारी भारताला लाभण्याची अत्यंत गरज आहे. कारण एका बाजूला भारत जागतिकीकरणाच्या विळख्यात, तर दुसऱ्या बाजूला भारताला आर्थिक प्रगती व जागतिक स्पर्धेमध्ये आपले स्थान बळकट करायचे असेल तर भारताला राजकीय स्थिरतेकडे लक्ष केंद्रीत केले पाहिजे. त्यात प्रादेशिक समस्यांना फाजील महत्त्व न देता राष्ट्राच्या हिताला प्राधान्य दिले पाहिजे.

भारताच्या आर्थिक विकासाचा विचार केला तर देशाच्या मानाने चीनच्या आपण अजून पुष्कळ मागे आहोत. परकीय चलनाच्या साठ्यात आपली परिस्थिती समाधानकारक आहे कारण आपण पाश्चिमात्य देशाना सॉफ्टवेअर पुरवतो आणि बरेच अनिवासी भारतीय, जास्त करून आखाती देशातले नियमितपणे भारतात आपल्या बँकांच्या खात्यात पैसे पाठवत असतात. पण याच्याशिवाय परदेशात निर्यात करण्यासाठी भारतात तयार केलेल्या वस्तू अशा किती आहेत? गेली १५ वर्षे मी अमेरिकेत राहिल्यामुळे मी स्वत:च्या अनुभवावरून सांगतो की अमेरिकेत प्रत्येक दुकानात जवळजवळ ९० टक्के वस्तू चीनमध्ये तयार झालेल्या सापडतात. त्यामुळे चीनला परकीय चलन किती भरपूर मिळते याचा आपण नीट विचार केला पाहिजे. याचा परिणाम म्हणजे चीनचा भरघोस आर्थिक विकास. तिथले लांबलचक उड्डाणपूल, मोठाले रस्ते. आधुनिक यांत्रिकीकरण व जलद आधुनिक राहणीमानाकडे कल. अर्थात याचे मुख्य कारण म्हणजे तिथली बळकट केंद्रीय कम्युनिस्ट राजवट. म्हणजे एक शिस्तीने जीवन जगण्याची पद्धत. भारतीयाना त्यांच्या लोकशाहीचा अभिमान आहे, पण ही लोकशाही की बेशिस्तशाही असा प्रश्न पडतो. जिथे बघावे तिथे कचऱ्याचे ढिग. खराब रस्ते, मोडकळीस आलेल्या जुन्या इमारती, सर्वसाधारण गलिच्छ राहणीमान, गर्दीची शहरे आणि गावे. त्यामुळे परदेशी प्रवासी केवळ कामापुरते व ऐतिहासिक स्थळ पाहण्यासाठी येत असतात. अशी लाजिरवाणी लोकशाही लवकरच बदलली पाहिजे.

दररोजच्या जीवनात तुलनात्मक दृष्ट्या कायदा व सुव्यवस्था भारतात अत्यंत कमजोर आहे. जशी अमेरिकेत मी गेली वीस वर्षे माझ्या शास्त्रीय संगीत व चित्रकलेच्या क्षेत्रात माझ्या कुटुंबाबरोबर घालविली, त्याप्रमाणे मी पंधरा वर्षे आखाती देशात Societe Generale, Oman (French Bank) आणि ABN-AMRO Bank, Saudi Arabia (Dutch Bank) यांच्या नोकरीत घालवली आहेत. या माझ्या वास्तव्यात मी दंगामस्ती, अस्वच्छता, कायद्याबद्दल अनादर हा अनुभवला नाही. तेव्हा भारताच्या नव्या राजवटीत कायदा व सुव्यवस्था कडक असावी असे वाटणे भाग आहे. आपल्या कोर्ट-कचेऱ्या, पोलीस कचेऱ्या, पोलिसांचे पोशाख, वर्षोनुवर्षे कोर्टात दावे चालू ठेवणे ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. लोकशाही म्हणजे स्वातंत्र्याचा दुरुपयोग आणि जबाबदारीची उपेक्षा नव्हे. याबाबतीत Grammer of Politics by Harold Lasky या पुस्तकात गेल्या शतकातल्या या ब्रिटीश विरोधी पक्षाच्या पुढाऱ्याचे विचार वाचण्यासारखे आहेत. `No rights without responsibilities' अशा प्रकारचे उद्‌गार आजही लक्षात ठेवण्यासारखे आहेत. गेल्या काही वर्षात भारतात सर्वोच्च न्यायालयाने आपली भूमिका बजावली आहे हे मान्य करावे लागेल. परंतु ही भूमिका अपुरी वाटते. कारण मग भ्रष्टाचार गेल्या दहा वर्षात एवढा का बोकाळला आहे की सरकारच्या निदर्शनात ही बाब आणूनसुद्धा सरकारने जाणूनबुजून कानाडोळा केला असे वाटणे साहजिक आहे. बी.जे.पी. सारखा एखादा राजकीय पक्ष सत्तेत येतो याचे कारण भारतातले सर्वसाधारण लोक अशा परिस्थितीला अक्षरश: कंटाळले असावेत असे वाटणे अवाजवी ठरू नये.

शेवटचा मुद्दा म्हणजे भारत हा खराखुरा धर्मनिरपेक्ष देश आहे का? भारतात मुख्य पाच धर्म आहेत. हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन, शीख आणि पारशी व इतर धर्म हे केवळ या पाच धर्माच्या शाखा आहेत असे धरून चालेल. तर रोजच्या जीवनात या सर्व धर्मांचे अनुयायी आपल्या धर्माच्या नियमाप्रमाणे जगत असतात. म्हणजे नवरा-बायकोची भांडणे. कुटुंबाचा मुख्य पुरुष किंवा स्त्री आणि त्याच्या हाताखालील त्याची मुले, गावातील मागासलेले लोक व त्याचे मुख्य आणि या सर्वांचे स्थावरजंगमाचे प्रश्न ही सर्व मंडळी एक सर्वसामान्य कायदा पाळत नाहीत. शहरात एकवेळ शिकलेला समाज आधुनिक कायदेपद्धतीनुसार आपापले प्रश्न सोडवत असेल, परंतु गावात आणि शहरातसुद्धा लोक जेव्हा हमरीतुमरीवर येतात तेव्हा ते त्यांच्या पारंपारिक धर्माच्या चाकोरीबाहेर जायला कचरतात. कारण ब्रिटिशांनी घालून दिलेली कायदापद्धती जरी कागदोपत्री स्पष्ट असली तरी त्याचे उल्लंघन जुन्या विचारांच्या आधारावर केले जाते, ही वस्तुस्थिती मान्य करावी लागेल. तेव्हा भारताचे सार्वभौमत्व व अखंडत्व टिकवायचे असेल तर सर्व प्रकारच्या गुन्ह्यांना एकच कायदेपद्धती हवी. भारतातले हे निरनिराळ्या धर्मांचे लोक इतर लोकशाही देशात राहतात तेव्हा ते एकाच कायदेपद्धतीचे अगदी आनंदाने पालन करतात. भारतात आजसुद्धा अनेक भांडणे व गैरसमज वर्षानुवर्षे जुन्या पद्धतीनुसार सोडवल्यामुळे गैरसमज चालूच राहतातच. परंतु अशा प्रवाहात सर्वसाधारण समाजाचे नुकसान होते आणि त्यामुळे सामाजिक परिवर्तन होत नाही हे आपण सर्वजण पाहतो. मी एक अमेरिकन रहिवाशी असलो तरी हजारो वर्षांचे माझ्या पूर्वजांपासून चालत आलेले भारताचे नाते मी झुगारून देऊ शकलो नाही. तेव्हा हा लेख लिहिण्यामागे हीच एक उत्कट भावना.

लेखांक-६

# केल्याने देशाटन

— हेमलता केशव कोठारे

आता कॅनबेराविषयी. सिडनी व मेलबॉर्न या दोन शहरांच्या वादातून शेवटी सन १९०८ला 'कॅनबेरा' ही ऑस्ट्रेलियाची राजधानी करण्यात आली. कारने गेल्यास सिडनीहून अवघ्या तीन तासाच्या अंतरावर हे शहर वसले आहे. येथे इंटरनॅशनल एअरपोर्ट नाही. सिडनीला उतरून पुढे कॅनबेराला जावे लागते. बसेसची सुविधा आहे. सिडनी ही आर्थिक राजधानी असल्याने येथे नोकरीच्या सुविधा जास्त आहेत. म्हणूनच कॅनबेराचे बरेच लोक सोमवार ते गुरुवार सिडनीत राहून विकेण्डकरिता शुक्रवारी आपल्या घरी जातात.

कॅनबेरा हे पूर्णत: नवीन आणि नियोजनबद्ध शहर वसविण्यात आले. शिकागो येथील वॉल्टर बर्ले ग्रिफीन आणि मेरीऑन मोरी ग्रिफीन या स्थापत्यकारांच्या जोडीने कॅनबेरा शहराचा आराखडा तयार करून या शहराची सुंदर रचना केली. रस्त्यांची रचना तर फारच उत्तम आहे. सगळीकडील रस्ते सगळीचकडून एकमेकांना जोडलेले आहेत. त्यामुळे होते काय की नवीन आलेल्या माणसाचा ड्रायव्हिंग करताना गोंधळ उडतो. सिडनीला छान समुद्र किनारा आहे. कॅनबेराला मात्र तो नाही. पण म्हणून काय झाले? त्या दोन स्थापत्यकारांनी मनुष्यनिर्मित विशाल सरोवर अगदी शहराच्या मध्यभागी निर्माण केले. ही राजधानी असल्याने ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांचे येथे वास्तव्याचे ठिकाण आहे. हे निवासस्थान आम्ही दुरून पाहिले. येथे साहजिकच पार्लमेंट हाऊस, हायकोर्ट, राष्ट्रीय टाकसाळ (मिंट), राष्ट्रीय संग्रहालय, राष्ट्रीय ग्रंथालय, निरनिराळी भव्य व देखणी म्युझियम्स तसेच महत्त्वाची शासकीय कार्यालये आहेत. या सर्व इमारतींमध्ये 'टुरिस्ट'ना प्रवेश आहे. महत्त्वाचे म्हणजे हा प्रवेश अगदी विनामूल्य! ऑस्ट्रेलियाप्रमाणेच कॅनडा, अमेरिका येथेही बऱ्याच ठिकाणी पर्यटकांना विनामूल्य प्रवेश आहे. अगदी फारच थोड्या ठिकाणी तिकीट काढावे लागते. रोजच्या रोज जगभरातून लाखोंनी पर्यटक येतात, पण त्यांना प्रवेशमूल्य लावले जात नाही. वरील सर्व शासकीय इमारतीही उत्कृष्ट ब्रिटिश स्थापत्याची पावती देतात. गोथिक आर्टची. येथील टाकसाळ भव्य आहे. ऑस्ट्रेलियाचे चलन (नोटा) प्लॅस्टिकच्या आणि नाणी आपल्याप्रमाणे धातूंची. गंमत म्हणजे त्यावर अजूनही ब्रिटनच्या राणीचाच फोटो असतो. कॅनडातही राणीचाच फोटो चलनावर असतो. म्हणजे अजूनही राणीचे प्रभुत्व आहे. भारतीय मानसिकता ब्रिटिशांची गुलाम आहे यात मग नवल ते काय? ब्रिटनचे प्रभुत्व असलेल्या अशा देशांना कॉमनवेल्थ कंट्रीज म्हणून ओळखले जाते. माझ्या मुलीकडून आणि मुलाकडून गोळा करून ऑस्ट्रेलियन, कॅनेडियन व अमेरिकन नाणी आणि नोटा यांचा छंद म्हणून मी संग्रह केला आहे. असो. सिडनीहून कॅनबेराला जाताना मध्ये एक छोटे गाव लागते. कोणते गाव? ओळखा पाहू. ते गाव म्हणजे जगप्रसिद्ध ऑस्ट्रेलियन क्रिकेटवीर ब्रॅडमनची जन्मभूमी आणि क्रिकेटची कर्मभूमी. त्याचे जुने घर जतन करून सरकारने त्याच्या जुन्या खेळवस्तूंचे (बॅट वगैरे...) संग्रहालय केले आहे. त्यात त्याच्या क्रिकेट करियरचा चढता आलेख देण्यात आला आहे. ही जतन करण्याची कला पाश्चिमात्यांकडून शिकण्याजोगी आहे. सचिन तेंडुलकर, लता मंगेशकर, जयंत नारळीकर हयात असतानाच जर सरकारने अशा संग्रहालयासाठी पावले उचलली तर तो भारताचा ऐतिहासिक, सांस्कृतिक, वारसा ठरेल. पण लक्षात घेतो कोण?

ऑस्ट्रेलियातील सिडनी खालोखाल औद्योगिक व आर्थिकदृष्ट्या मोठ्या क्रमांकाचे शहर म्हणजे मेलबर्न. या शहराला भेट देण्याचाही योग आला. मेलबर्न ही व्हिक्टोरिया प्रांताची राजधानी. येथे केनसारखे मोठे वर्षारण्य आहे. त्याच्याजवळ बॅरियर रीफ आहे. सिडनीप्रमाणेच मेलबर्न शहरालाही विशाल समुद्र किनारा लाभला आहे. मोठमोठे पार्कस् आहेत शहरात. त्यात रंगीबेरंगी, विविध जातीच्या फुलांची रेलचेल. या शहरातील ट्रामचे जाळे हे खास वैशिष्ठ्य. मुंबईतील ट्राम बंद झाली. पण कुठूनही कुठेही जाण्यासाठी या शहरातील ट्राम सर्वात सोयीस्कर. खरे तर ब्रिटिशांच्या आवडीचीच ट्राम. त्यामुळे जेथे जेथे त्यांनी अधिराज्य केले तेथे तेथे त्यांनी ही ट्राम नेली. मेलबर्न तसे इतर शहरांसारखेच. प्रेक्षणीय स्थळांचे उत्तम प्रकारे जतन करून ती येथेही पर्यटकांसाठी विनामूल्य आहेत. असे भारतात नाही! मेलबर्नचा माझा प्रवास मुलगा आणि सून यांचेबरोबर झाला. येथे त्याने कार भाड्याने घेतली आणि आमचा पुढचा प्रवास कारने झाला. मेलबर्नवरून पुढे २४३ किलोमीटरचा ग्रेटओशन ड्राईव्ह आहे. सलग २४३ किलोमीटरचा. फिकट हिरवट-निळसर रंगाचा अथांग सागर एकीकडे; तर दुसरीकडे पहाड. फारच सुंदर प्रवास! रस्त्यावर जागोजागी कारच्या गतींबाबत आकड्यांचे फलक लावलेले असतात. काही ठिकाणी ताशी ६० किलोमीटर तर काही ठिकाणी ७० किलोमीटर, तर काही ठिकाणी ५० किलोमीटर असा वेग ठेवावा लागतो. या नियमांचे उल्लंघन एखाद्याने केल्यास त्यास रोड ट्रान्स्पोर्टचे (आरटीओ) तिकीट आणि त्यावर आकारलेला दंड घरी पोहचता होतो. कारण सिडनी, मेलबर्न किंवा बऱ्याच ठिकाणी रस्त्यावर छुपे कॅमेरे असतात. ते सहसा दिसत नाहीत. मग नियमांचे उल्लंघन करणारी कार या कॅमेऱ्यात आली की भरा मोठा दंड. रस्त्याच्या निरनिराळ्या नियमांचे (गती, अपघात, सिग्नल तोडणे वगैरे) उल्लंघन होऊन जर दहा तिकीटे मिळाली तर कारचा इन्शुरन्स जबरदस्त वाढतो. एवढेच नव्हे तर काही काळाकरिता लायसन्स रद्द केले जाते. आता आपल्याकडे मोदी सरकार आलेय्. त्यांनी ही अशी व्यवस्था जर केली तर प्रवास कितीतरी शिस्तबद्ध होईल. प्रवासाचा आनंदही मिळेल. २४३ किलोमीटरचा प्रवास करताना निळा हिरवा समुद्र आणि पहाड-जंगले बघत माझा प्रवास फार सुखकर झाला. मन अगदी प्रफुल्लित झाले.

मेलबर्नहून पुढे 'बॅलारट' हे ब्रिटिशांच्यावेळी वसलेले गाव बघितले. तेथील सोन्याची खाण पाहिली. १८५० मध्ये या खाणीचा शोध लागला. येथे त्याकाळी जसे चित्र होते; उदा.- त्यावेळचे पोशाख, घोडागाडी वगैरे वाहने, अवजारे, शस्त्रे, घरे घोडे इत्यादींचा हुबेहूब देखावा निर्माण करण्यात आला आहे. हा देश खनिज संपत्तीकरिता प्रसिद्ध आहे. जगातील एकूण युरेनियमपैकी चाळीस टक्के युरेनियम एकट्या या देशात आहे. प्रगत देशातील वैज्ञानिकांमा अणुचाचण्यासाठी युरेनियमची किती नितांत गरज आहे हे वेगळे सांगणे नलगे. मध्यंतरी भारतात युरेनियम पुरविण्याला ऑस्ट्रेलियाने नकार दिला होता. याशिवाय या देशात सोने, हिरे आहेत. लोह आणि कोळसा यांचे प्रचंड साठे आहेत. कोळसा निर्यात करण्यात हा देश प्रथम क्रमांकावर अग्रेसर आहे. कारण येथे घनदाटप्रचंड मोठी अरण्ये (Dense Forest) आहेत. भारत अशा अरण्याची बेसुमार कत्तल करतो. पण ऑस्ट्रेलिया या नैसर्गिक संपत्तीमुळे सधन, समृद्ध बनला. बॅलारटची खाण बघण्याकरिता आम्हाला रेड हिलवरची जमिनीच्या भूगर्भातील दहा मिनिटांची टूर करावी लागली. चार चार जणांची समोरासमोर बसण्याची सोय असलेली ट्रेन जमिनीखाली जाते. सगळीकडे अंधार. बाजूला किंचित मिणमिणते दिवे. मनावर थोडे दडपण येतेच. तळाशी गेलं की दोन पहाडांमधल्या अगदी निमुळत्या रस्त्याने आपण पुढे जातो. सोबतचे खाणकर्मचारी माहिती देतात. मिनीथिएटरमध्ये सोन्याखाणीची 'डॉक्युमेंटरी'ही दाखवतात. खाणीत फिरताना पहाडाला चिकटलेले कच्च्या स्वरूपातील सोने पाहायला मिळाले. पण मनात कसले ते सोन्यासारखे विचार! समजा; अचानक वरून काही कोसळले तर इथेच मोत्र! कामगार जीवावर उदार होऊन कसे काम करत असतील? खाणीतून वर आल्यावर सोन्याची वीट कशी बनते त्याचे प्रात्यक्षिकही दाखवण्यात आले. अब्ब! एवढी मोठी सोन्याची लखलखची वीट प्रथमच 'याचि देही याचि डोळा' पाहिली! याच खाणीत पूर्वी २१५ किलोचा कच्च्या स्वरूपातील सोन्याचा गोळा मिळाला होता; म्हणे. खाणपरिसरात पाण्याचे ओढे आहेत. पर्यटकांना चाळण्या देतात. पाण्यातील रेती गाळून जर त्यात कोणाला सोन्याचे कण मिळाले तर ते त्या पर्यटकाचे. त्यामुळे बरेच स्त्री-पुरुष-मुले चाळण्या घेऊन आपापले नशीब चाळत बसतात. पाहून मजा वाटली. ऑस्ट्रेलियातील 'पर्थ' येथे सोन्याची टाकसाळ आहे. सिडनीपासून पर्थ दूर असल्याने जाणं काही जमलं नाही. 'लंकेत सोन्याच्या विटा!'

मेलबर्नच्या काही अंतरावर 'फिलिप' बेट आहे. येथला समुद्रकिनारा फारच रम्य. पेंग्विन पक्षी आणि त्यांची किनाऱ्यावरील परेड यासाठी हा प्रसिद्ध हे पक्षी. त्यांना पंख असतात. पण उडता मात्र येत नाही. केव्हढे हे दुर्दैव, हे जलचर प्राणीही नाहीत. तरीही केवळ श्वास रोखून ते बिचारे समुद्रात असतात आणि मासे पकडतात. ही योगविद्या त्यांना कोणी बरे शिकवली? त्या विधात्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच! सूर्योदयापूर्वी पेंग्विन नर थव्याथव्याने समुद्रात उतरतात. पोचात बरचसे मासे भरून सूर्यास्तानंतर थव्याथव्याने समुद्रकिनारी परततात. आपल्या तोकड्या पायांनी भराभर चालून अचूक आपल्या घरट्याकडे वापस. एवढ्याशा प्राण्याला परमेश्वराने दिलेली ही केवढी अचाट स्मरणशक्ती! समुद्रातून बाहेर पडून घरट्यापर्यंत अगदी एका रांगेत चालत जातात. हीच ती प्रसिद्ध 'पेंग्विन परेड'! ही परेड बघायला किनाऱ्यावर हजारो लोक बसलेले असतात. खास बसण्यासाठी व्यवस्था असते. 'परेड' फारच मनोहारी. घरट्यात आल्यावर आपल्या पिलांना व मादीला ते दिवसभराची कमाई-खाद्य-(मासे) देतात. काय ही निर्मात्याची लीला! अंधार पडल्यावरच ही परेड सुरू होते. का? अहो, इतर मोठ्या प्राण्यांना ते त्यामुळे चटकन् दिसून येत नाहीत. म्हणजे स्वसंरक्षणही. किती चतूर! या परेडचे फोटो काढायची जबरदस्त इच्छा असते. पण पर्यटकांना त्यावर बंदी आहे. कारण कॅमेऱ्याच्या प्रकाशझोताने हा पक्षी आंधळा होतो.

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानुजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

| | | | |
|---|---|---|---|
| १७-०५-१४ | सौ. करुणा आणि हिमेश प्रफुल्ल राणे | पुत्र | अंधेरी |

### आत्याबाई नाव बोला

| | | |
|---|---|---|
| २५-०५-१४ | रोमिर तेजस प्रदीप राणे | गिरगाव |

### कुर्यात बटोर्मंगलम्

३०-०५-१४ राहिल रितेश विजयकर

### विवाह सुवर्ण महोत्सव

| | |
|---|---|
| २४-०५-१४ | कु. प्रमिला विनायक धुरंधर, श्री. अरुण पूर्णानंद तळपदे |
| ३१-०५-१४ | कु. प्रफुल्लता परिक्षित कोठारे. श्री. मधुचंद्र श्रीपाद तळपदे |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १३-०५-१४ | श्री. प्रसन्न वामनराव कीर्तिकर | वय, ९५ | खारदांडा |
| १७-०५-१४ | श्री. राहुल जगदीश जयकर | वय ४३ | ठाणे |
| १७-०५-१४ | श्रीमती सीमंतिनी वसंतराव नवलकर | वय ८८ | खार |
| ३०-०५-१४ | श्रीमती सुहासिनी वसंत देसाई | वय ९० | अंधेरी (प.) |
| ०३-०६-१४ | श्रीमती लीना कृष्णकुमार नायक | वय ७९ | बोरीवली (पू.) |

## प्रभुतरुणास देणगी

✳ श्रीमती प्रमिला मधुकर तळपदे यांजकडून त्यांचा नातू श्री. करन सलील तळपदे आलाबामा विद्यापीठातून एमएस इन बिझनेस ॲनालिटिक्स ही परीक्षा उत्तम रीतीने पास झाल्याबद्दल रु. १,००१/-. करनचे अभिनंदन.

✳ कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ श्री. उन्मेष प्रकाश नायक यांजकडून आश्रयदाते म्हणून रु. ११,०००/-

✳ सौ. नीता सेंजितकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

✳ कुमार घृअंक अंकिता प्रनील कोठारे (वय वर्षे ८) याने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातर्फे आयोजित 'जनरल नॉलेज' परीक्षेत आपल्या सेंट जोसेफ हायस्कूल (मालाड प.)ला २३ शाळांमधून तिसरा क्रमांक मिळवून दिला. तसेच 'इंटरनॅशनल ऑलिम्पियाड' मध्ये इंग्लीश विषयात त्याचा शाळेतून पहिला क्रमांक आला. त्यानिमित्त त्याला सुवर्णपदक प्राप्त झाले. या यशाप्रीत्यर्थ सौ. अंकिता आणि श्री. प्रनील कोठारे यांजकडून रु. ५०१/- अभिनंदन घृअंक!

✳ सौ. अनिला आणि डॉ. श्री. प्रभाकर कोठारे यांजकडून नातू कुमार घृअंक प्रनील कोठारे याच्या यशाप्रीत्यर्थ रु. ५०१/-

✳ सौ. शील आणि श्री. प्रफुल्ल श्रीपाद राणे यांजकडून त्यांना नातू झाल्याबद्दल रु. २५१/-

सर्व देणगीदारांचे आभार.

## अभिनंदन

✳ कु. आदिती अनुराधा सीमित देसाई (वय वर्षे ९) हिने हिरानंदानी फाऊंडेशन स्कूल (ठाणे) तर्फे इंटरनॅशनल ऑलिम्पियाडमध्ये गणित विषयात ए प्लस ग्रेड मिळवली. अभिनंदन.

✳ आर्किटेक्ट उज्ज्वला आगासकर यांनी 'लोकसत्ता'मधून डॉ. गटणेसरांच्या आठवणी जागवल्या.

✳ श्री. शीतल नागेंद्र तळपदे यांची अकाउंटस् ऑफिसमध्ये ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर म्हणून बढती झाली. अभिनंदन.

✳ श्री. हिरेन नायक यांची उच्च पदावर नियुक्ती झाली. अभिनंदन.

✳ Mr. Satish Kishor Kirtikar who holds a Master's degree in Propulsion Engineering from Paris University has been promote to Vice-President, Business Development to SNECMA (A French Company which manufactures Aircraft and Rocket Engines for satellites, Military etc.) Congratulations.

✳ सौ. स्वरांगी स्मितचंद्र नवलकर यांची 'नैकार बिल्डर्स अँड डेव्हलपर्स प्रा. लिमिटेड कंपनीत संचालकपदी नेमणूक झाली. अभिनंदन.

✳

## परीक्षेतील सुयश

**एम्.एस्. इन बिझिनेस ॲनालिटीक्स,**
**(अलाबामा विद्यापीठ)**
श्री. करन सलील तळपदे

## हसा जरा

सध्या परीक्षांचे निकाल लागत आहेत. आता नव्या आयुष्याच्या वळणासाठी नवनवीन धडपड करावी लागेल. पण तोपर्यंत परीक्षेच्या यशाचा आनंद भोगू या. जरासे हसून!

० ० ०

✳ एका खेड्यातला माणूस शहरात येतो. वाटेत मित्र भेटतो. तो त्याला घरी घेऊन जातो. सरबत देतो. कधी बर्फ न पाहिलेला तो सरबतातला बर्फाचा खडा काढतो. हातावर ठेवून त्याकडे बराच वेळ पहात राहतो. मित्र चकीत. तो म्हणतो, ''अरे, काय पाहातो आहेस?'' गावंढळ फार गंभीर होऊन म्हणतो, ''अरे, मी मघापासून बारकाईने पहातोय्. हा बर्फ कुठून लीक होतोय तेच कळत नाही.''

० ० ०

✳ एकदा एका मुंगीचं हत्तीशी लग्न झालं. ती खूष झाली. दुसऱ्या दिवशी हत्ती मेला. झाऽऽलं! पुढे ती मुंगी आयुष्यभर हत्तीसाठी कबर खोदत होती.

० ० ०

✳ प्रवासात तिकीटचेकरने तिकीट मागितले. तिकीट नव्हतेच काढलेले. चेकरने विचारले, ''भाऊ कुठे निघालात?''

प्रवासी म्हणाला, ''राम जन्मभूमीला.''

चेकर लगेच म्हणाला, ''नका नका भाऊ. मी घेऊन जातो तुम्हाला...''

''कुठं?''

''कृष्णजन्मभूमीत.''!

० ० ०

✳ रंगाऱ्याला विमान रंगवायचे काम मिळाले. पण रंग कमी पडला. त्याच्या हुश्शार मित्राने सल्ला दिला. ''त्यात काय? अरे, रंग कमी आहे ना? विमान आकाशात उडलं की लहान दिसतं. तेव्हा रंगव त्याला. आहे काय नि नाही काय?''

० ० ०

**खास पाठारे प्रभूंचा ताशा**
मुंजी, लग्न, वरघोडा आणि वरातीसाठी संपर्क:-
**श्री. मंगू ताशेवाला**
मोबाईल नं.:
९९२०५८२२६५/९९३०८३८६९९
पत्ता:
खोली क्र. ७, पहिला मजला,(जयश्री मसाला वर), बिल्डिंग नं. ६७/६९, कामाठीपुरा ७वी गल्ली, एम. आर. रोड, मुंबई-४००००८

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.
संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67